वन विभागांतर्गत पशु वैद्यकीय अधिकारी (गट-अ), पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) व पशुसंवर्धन उप आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) या तीन संवर्गातील पदे निर्माण करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.१६/फ-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०६ मे, २०१९.

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग पत्र क्र. डब्ल्युएलपी-०८१८/प्र.क्र.२९३/फ-१ दि.२७/१२/२०१८.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग) म.रा.,नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-७(१)/ले-१/ प्र.क्र.४२/२०१३-१४/ १६४/ नागपूर दि.२८/०१/२०१९.

प्रस्तावना :-

राज्यात गोरेवाडा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व माणिकगड (जुन्नर विभाग) येथे वन्यप्राणी बचाव केंद्र वनविभागामार्फत चालविण्यात येतात. त्याशिवाय चंद्रपूर, वडाळी, नवेगांवबांध व सेमीनरी हिल्स् नागपूर येथे तात्पुरते वन्यप्राणी उपचार केंद्र कार्यरत आहेत.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, डब्ल्यूएलपी-२०१३/प्र.क्र.९४/फ-१ दि.३/०६/२०१५ अन्वये राज्य वन्यजीव मंडळाचे पुर्नरचना करण्यात आली आहे. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या कलम ६ मधील तरतूदीप्रमाणे मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाचे गठन करण्यात आले आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाची १४ वी बैठक दि.०५/१२/२०१८ रोजी मुंबई येथे संपन्न झाली होती. सदरहू बैठकीमध्ये मा. अध्यक्ष, राज्य वन्यजीव मंडळ तथा मा. मुख्यमंत्री यांनी वन विभागांतर्गत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा स्वतंत्र संवर्ग निर्माण करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रात व बफर क्षेत्रात तसेच लगतच्या इतर क्षेत्रात वन्यप्राण्यांबाबत काही घटना घडल्यास तातडीने पुढील कार्यवाही करणेसाठी पशुवैद्यकीय अधिका-यांची गरज भासते. तथापि व्याघ्र प्रकल्पामध्ये पशुवैद्यकीय अधिका-यांचे पद मंजूर नसल्यामुळे यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. काही वेळेस जखमी झालेल्या वन्यप्राण्यांना तातडीने उपचार करणेसाठी, वन्यप्राणी मृत पावलेल्या प्रकरणांमध्ये तातडीने पुढील कार्यवाही करण्यासाठी, अपवादात्मक परिस्थितीची निकड लक्षात घेऊन वन्यप्राण्यांना जेरबंद करणे किंवा ठार करणे इत्यादी प्रकरणे हाताळण्यासाठी पशुवैद्यकीय अधिका-यांची नितांत गरज आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन वन विभागांतर्गत पशु वैद्यकीय अधिकारी (गट-अ), पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) व पशुसंवर्धन उप आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) या तीन संवर्गात पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राज्य वन्यजीव मंडळाच्या दि.०५/१२/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेले निर्देश तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.२ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार वन विभागांतर्गत नव्याने खालील १० अस्थायी स्वरुपातील पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रु) ६ व्या वेतन आयोगानुसार	पद संख्या
१	पशु वैद्यकीय अधिकारी (गट-अ)	(वेतन बँड ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४००),	६ पदे
२	पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त (वन्यजीव) (गट-अ)	(वेतन बँड १५६००-३९१०० + ग्रेड पे ५७००)	३ पदे
३	पशुसंवर्धन उप आयुक्त (वन्यजीव) (गट-अ)	(वेतन बँड १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६००)	१ पद

२. वरील अस्थायी पद निर्मितीच्या प्रस्तावास खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) सदरहू पदे अस्थायी स्वरुपात वन विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत राहतील.

आ) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा. नागपूर यांनी नवनिर्मित पदांकरिता सेवा प्रवेश नियम तयार करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

इ) पशु वैद्यकीय अधिकारी (गट-अ) या संवर्गातील पदे नामनिर्देशनाने भरण्यात यावीत.

ई) पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) या संवर्गातील पदे पशु वैद्यकीय अधिकारी (गट-अ) या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात यावीत.

उ) पशुसंवर्धन उप आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) या संवर्गातील पद पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त (वन्यजीव) (गट-अ) या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात यावे.

३. सदरहू पदांच्या वेतन व भत्यावरील खर्च हा प्रधान शीर्ष -२४०६-वनीकरण व वन्यजीवन योजनेत्तर, उप प्रधान शीर्ष ०२-पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीव, गौण शीर्ष ११०- वन्यजीवन, उप शीर्ष ११०-वन्यजीवन, पर्यटन व वन्यपशू संरक्षण (२४०६ -०७६६) या लेखा शीर्षातून भागविण्यात यावा.

४. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्र.९३/आपुक/१९ दि.१५/०२/२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५०६१४५१५१६३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b8040 5514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f3 3a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.05.06 14:57:41 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (कार्मिक), नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर / मुंबई.
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई /नागपूर.
११.सर्व मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक.
१२.सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),
१३.मा. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक
१४.मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१५.प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
१६.वन विभागातील सर्व कार्यासने.
१७.निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.